# योशीया राजाप्रमाणे, आम्ही देवाच्या वचनाच्या अधिकाराचा आदर करतो

मुलांना शिकविणाऱ्यांनी A3b अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** ''प्रिय पवित्र आत्म्या, आम्ही अगदी अंत:करणपूर्वक तुझे वचन शिकून आज्ञा पालन करावे; यासाठी आमची मने प्रकाशित कर. हे इतरांनाही समजावून सांगण्यास आम्हाला साहाय्य कर म्हणजे त्यांनाही आमच्या आनंदात सहभागी होता येईल.''


1. **देवाच्या वचनातून शिकण्यासाठी तुमच्या अंत:करणाची तयारी करा.**

**2 इतिहास 34 वाचा आणि पाहा:**

- देवाचे आज्ञापालन करता यावे यासाठी योशीयाने मानवी धार्मिक परंपरा कशा मोडल्या.

  (उत्तर: पाहा वचने 3-7 योशीयाने लोकांच्या मूर्ती नाकारल्या, आम्ही देखील देवाच्या कळपाची देखभाल मनुष्याच्या रीतीरिवाजांप्रमाणे नव्हे तर देवाच्या इच्छेप्रमाणे करणे अगत्याचे आहे.)
- नियमशास्त्राचा ग्रंथ (देवाचे वचन) शोधण्यासाठी योशीयाच्या लोकांनी किती कसून प्रयत्न केले.

  (उत्तर: पाहा वचने 8-15 देवाचे वचन दुर्लक्षित मंदिरात हरविले होते.)
- जिथे लोकांनी देवाच्या वचनाचा त्यांच्या त्यांच्या भाषेत अचूक अनुवाद केलेला नाही तिथे आजही देवाचे वचन लोकांपासून गुप्त राहिलेले आहे. अचूक अनुवाद उपलब्ध व्हावा यासाठी अनेक भाषांतरकार अथक परिश्रम घेत आहेत.



**प्राचीन काळी पुस्तके गुंडाळल्या जाणाऱ्या गुंडाळीपत्रांवर लिहिली जात.**

- शास्त्र लेखांचा अभ्यास करतांना योशीयाने देवाची मदत कशी घेतली (उत्तर: पाहा वचने 21-28). पवित्र आत्मा आम्हा विश्वासणाऱ्यांच्या ठायी राहून आम्हाला सत्याच्या मार्गाने नेतो (योहान 16:13). आम्ही देवाच्या वचनाचा अभ्यास करीत असतांना त्याने आमच्या मनात प्रकाश पाडावा अशी विनंती करतो (इफिस 1:15-18).
- योशीयाच्या दृष्टीने देवाच्या वचनाचा अधिकार काय होता आणि त्याने काय केले. (उत्तर: पाहा वचने 30:33 आम्हाला विश्वासाने देवाचे प्रकटीकरण मिळते आणि आम्ही त्याचे आज्ञापालन करतो.)

**येशूने सैतानाचा प्रतिकार कसा केला ते मत्तय 4:1-11 मध्ये पाहा.**

- सैतानाने कोणत्या तीन मार्गांनी येशूची मोहपरीक्षा घेतली?
- सैतानाच्या प्रत्येक मोहपरीक्षेचे उत्तर देण्यासाठी येशूने कोणती वचने सांगितली?
- येशूच्या मोहपरीक्षेनंतर कोणी येऊन त्याची सेवा केली?

## पार्श्वभूमी

- पवित्र आत्म्याने सात्विक देवभिरू माणसांना देवाचे वचन लिहिण्यास प्रेरणा दिली (1 तीमथ्य 3:16-17). त्यांनी जुना करार इब्री भाषेत तर नवा करार ग्रीक भाषेत लिहिला:
- इब्री भाषा उजवीकडून डावीकडे वाचतात:

  בְּרֵאשִׁית בָּרָא אֱלֹהִים אֵת הַשָּׁמַיִם וְאֵת הָאָרֶץ׃ ←

- ग्रीक भाषा डावीकडून उजवीकडे वाचतात:

  Ἐν ἀρχῇ ἦν ὁ λόγος, καὶ ὁ λόγος ἦν πρὸς τὸν θεόν, καὶ θεὸς ἦν ὁ λόγος.

- पुढील गोष्टींच्या आधारे पवित्र शास्त्रातील उतारा आम्हाला अधिक चांगल्याप्रकारे समजेल:

  कोणी, कोणाला व का लिहिला?

  कोठे व केव्हा घटना घडल्या?

  उताऱ्यामध्ये कोण बोलत आहे?

  ह्यातून आमची कोणती तयारी करून घेतली आहे?

पवित्र शास्त्रातील काही भाग आणखी अधिक चांगल्या रीतीने आम्हाला समजतो त्यासाठी आम्ही प्राचीन इस्राएलमधील रीतीरिवाज इतिहास व भूगोल जाणून घेतला पाहिजे. याविषयी अधिक इतर पौल तीमथ्य मेंढपाळाचा व पुरवणी अभ्यासातून शिका, (पाहा पौल तीमथ्य शिक्षक पत्रिका, पवित्र शास्त्र विभाग).

## 2. आठवड्यातील कार्यक्रमांची योजना आखा

- तुमच्या सहकाऱ्यांच्या सहकार्याने आठवड्यामध्ये कुटुंबांनी देवाच्या वचनाचा अभ्यास करण्यास आस्थेने सुरुवात करावी यासाठी त्यांना साहाय्य करा.
- तुमच्या भागातील भाषांतर व साक्षरता प्रसाराच्या कार्याला तुम्हाला कशी मदत करता येईल याचा शोध घ्या.

## 3. सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासनासभेची योजना आखा

- प्रसंग आणि स्थानिक रीतीरिवाजांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा.
- पवित्र आत्म्याने मंडळीला देवाच्या वचनासंबंधाने मार्गदर्शन करावे यासाठी उपासनेमध्ये प्रार्थना करा.
- देवाच्या वचनात प्रकट झालेल्या सत्याबद्दल त्याची स्तुती करा. मागील आठवड्यात पवित्र आत्म्याने लोकांना पवित्र शास्त्रातून आनंद पावित्र्य मिळविण्यासाठी कशी मदत केली त्याबद्दल साक्ष देण्यास सांगा.

  योशीया राजाचा वृत्तांत सांगा किंवा त्याचे नाट्यीकरण करा.

- 2 इतिहास 34 मधील वृत्तांत सांगण्यासाठी एक मदतनीस तयार करा.
- प्रथम, इस्राएल लोकांच्या जीवनात देवाच्या वचनाने कसा बदल घडवून आणला ते प्रत्येकाला लक्षपूर्वक ऐकायला सांगा. विश्वासणाऱ्यांना काय समजले ते विचारा. वर भाग 1 मध्ये दिलेले प्रश्नविचारा.

आमची मने प्रकाशित करण्यासाठी पवित्र आत्मा देवाच्या वचनाचा कसा उपयोग करून घेतो हे नाट्यरूपाने दाखवा.

विद्यार्थ्याने टेबलावरील मेणबत्ती पेटवावी आणि मग दुसरीकडे पाहावे.

**‘सैतान’:**

- आवाज न करता सरपटत मेणबत्ती जवळ येऊन ती विझवा आणि विकट हास्य करा.

- विद्यार्थ्यांच्या डोळ्यांवर फडके बांधून त्याचा हात धरा आणि म्हणा, ''चल!'' (चाला)
- लोकांकडे बोट करून पुढील कविता म्हणाः

''अरे मूर्खांनो माझ्या शत्रूच्या मागे जाता काय! तुमचे बंडच मोडून काढतो!

माणसाच्या परंपरेने तुम्हाला शिकवून त्याच्या वचनापासून तुम्हाला मागे खेचतोच की नाही ते पाहा!

अरे मर्त्य मानवांनो, त्याच्यासह भोजन करता काय, तुम्हाला काय वाटते, त्यामुळे नरकाच्या अग्नीपासून सुटका होईल?

निकराने सांगतो, विरोध करू नका नाहीतर नरकाच्या भयंकर आगीचा चटका बसेल!''

**सुवार्तिक** (जोराने ओरडा)

- ''सैताना थांब, नाहीतर तू खोल खोल खड्ड्यात पडशील!''
- 2 करिंथ 4:4 वाचा ('ह्या युगाच्या दैवताने आम्हाला आंधळे केले आहे')
- मेणबत्ती पेटवून ती पवित्र शास्त्रावर आणि 'सैतान' व विद्यार्थ्याच्या समोर धरा.

**'सैतान'**: वेदनेने कण्हत विव्हळत खाली पडा. तुमचे डोळे झाकून घ्या आणि मोठ्याने ओरडून म्हणा ''हा भयंकर प्रकाश माझ्यापासून दूर घेऊन जा!'' (निघून जा)

**सुवार्तिकः** ''सैतान, या जगाचे दैवत ह्यानेच तुमच्या डोळ्यांवर ही पट्टी बांधली.'' (डोळ्यावरील पट्टी सोडा)

**विधार्थीः** ''माझ्या डोळ्यांवर पट्टी बांधलेली होती हे मला माहीतच नव्हते!'' (पवित्र शास्त्रातून योहान 16:13-14 वाचा)

**पाठ करा** : मत्तय 4:4

मुलांना त्यांनी तयार केलेली कविता नाटिका व प्रश्न सादर करायला सांगा आठवड्याताल तुम्ही ठरविलेले कार्यक्रम जाहीर करा.

प्रभु भोजनाची ओळख करून देण्यासाठी वाचा 2 इतिहास 30 वचने 5-6 व 25-27. येशू येण्यापूर्वी, देवाचे लोक कोकऱ्याचे होमार्पण करीत. देवाने त्यांची मिसरामधील गुलामगिरीतून सुटका केली. त्याची आठवण म्हणून हे होमार्पण ते खात असत, हे स्पष्ट करून सांगा. आता, येशू हा देवाचा कोकरा आमची पातके दूर करतो.

दोन किंवा तीन जणांचे गट करून बसा. प्रार्थना करा, योजना आखा आणि एकमेकांना प्रोत्साहन द्या.

Copyright © 2003 by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net